C 13-06-2011 Monday)

जबाब

दिनांक १३/०६/११

अमीरअली इब्राहिम श्रॉफ, वय ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, रा.ठी. फ्लॅट क्र. ७०१/७०२, इ विंग, मधुबन को.ऑ.हौ.सोसायटी, यारी रोड, वर्सोवा, मुंबई – ६१, मोबाईल क्र. – ९३२३७३४६५६

---

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्यावर माझे कुटुंबियांसह सुमारे १० वर्षापासून रहावयास आहे. मी अकाऊंटस्चे काम करीत होतो परंतु आता त्यातून निवृत्त झालो असून, माझी तीन मुले नामे १) रियाज, वय ३७ वर्षे, व्यवसाय – बॅकेमध्ये नोकरी, २) फैयाज, वय ३५ वर्षे, व्यवसाय – बिझनेस व आसिफ, वय ३३ वर्षे, व्यवसाय – बिझनेस हे सध्या काम करतात.

आझाद मैदान पोलीस ठाणे गु.र.क्र. २४२/१० कलम ४२०,४६५,४६७,४६८,४६९,४७१, ४७४,१२०(ब),५०६,३४ भा.दं.वि. या गुन्हयाचे अनुषंगाने स.पो.नि. केंगार यांनी मला पत्र पाठवून गुन्हयाच्या तपासकामी हजर रहाणेबाबत कळविल्याने आज रोजी मी समक्ष हजर राहून लिहून देतो की, नमूद पत्रान्वये माझेकडे मागणी करण्यात आलेल्या श्रीमती रजिया अमीरअली श्रॉफ यांनी मुलगा नामे आसिफ व फैय्याज यांना दिलेल्या दिनांक १२/०४/१९९९ रोजीच्या अधिकार पत्राच्या मूळ प्रती तसेच श्रीमती रजिया असिफअली श्रॉफ, श्रीमती मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी बांद्रा येथील सीटी सर्व्हे क्र. एच/३४६, एच/३४७, एच/३४८, एच/३४९ येथील जागा फैयाज व आसिफ यांच्या नावे करण्याबाबत दिलेल्या अधिकार पत्राच्या मूळ प्रती व सीटी सर्व्हे क्र. १२१ महालक्ष्मी इंटर्न साईड ऑफ वरळी, लोअर परेल डिव्हिजन १/४७, २/४७, ११७, ११८, ११९, १२०, १२१ यांचे मूळ मालमत्ता पत्रक माझ्याकडे नाहीत. ते सीटी सर्व्हे कार्यालयाकडून आपणास मिळू शकतील.

परंतु मी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली याचिका क्र. २६७७/०७ ची प्रत तसेच श्रीमती रजिया श्रॉफ, श्रीमती मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांचे पॉवर ऑफ अटर्नीच्या प्रती मी या सोबत सादर करीत आहे.

माझा जबाब मराठीत टंकलिखित केला असून, तो मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितला माझे सांगण्याप्रमाणे तो बरोबर आहे.

---

समक्ष

[signature] 13/06/2011
1250
SB HO
2/10

सहाय्यक पोलीस निरीक्षक
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.

मृत्युपत्र न्यायालयात सादर केले नाही. त्यामुळे त्यांची मूळ वारस मुलगी नामे खैरुन्निसा कमलउद्दीन प्रधान यांना त्यांच्या मालमत्तेमधून कोणत्याही प्रकारची माहिती न होता त्यांनी सदरची मालमत्ता कपासी यांना विकलेली आहे. यामध्ये फजलभाई इब्राहिम तसेच हुसैन शरीफ लखानी व मोहमद शरीफ लखानी यांनी कपासी यांचेशी संगनमत करुन वरळी येथील मालमत्ता बेकायदेशिरपणे हडप केलेली आहे.

फटाकडा चाळ, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई याठिकाणी मी अधून मधून जात होतो. त्यावेळी तेथील भाडेकरु हे माझी पत्नी नामे रजिया हिला सदर जागेची मालकीण असल्याने मी तेथील भाडेकरुंशी बोलणी केली असता, त्यावेळी मी ॲड. मोरजे यांचेशी बोलणी करुन त्यामधून कशा प्रकारे मार्ग काढता येईल याकरीता वरळी येथील सन व्हिला हॉटेल येथे फटाकडा चाळीतील रहिवाशांसोबत मिटींग घेतली.

तसेच सदरची जागा कपासी यांनी मा. उच्च न्यायालयाची दिशाभूल करुन बेकायदेशिरपणे ताब्यात घेतली असल्याने सदरची जागा न्यायालयीन वादासह विकत असल्याबाबत इंटरनेटवरुन जाहिरात दिली होती. परंतु सदरच्या जागेबाबत मी कोणाकडूनही पैसे घेतलेले नाहीत. तसेच हुसैन शरीफ लखानी व मोहम्मद शरीफ लखानी आणि शांतीलाल कपासी व फॅमिली यांच्यामध्ये सन १९८५ मध्ये कन्सेन्ट डिक्री झालेली होती. परंतु त्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली नव्हती. परंतु मोहम्मद शरीफ लखानी व हुसैन शरीफ लखानी यांचा मृत्यु अनुक्रमे सन १९९५ व १९९४ साली झाल्यानंतर शांतीलाल कपासी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सन १९९८ मध्ये अर्ज करुन सदरची फटाकडा चाळ येथील जागा त्यांच्या नावावर नोंद करुन घेतलेली आहे. म्हणजेच कपासी यांनी जाणून बुजून लखानी बंधू जिवंत असताना मालमत्ता नावावर करण्याबाबत अर्ज केलेला नाही. त्यामध्ये मोठया प्रमाणात अफरातफर झाल्याचे मला दिसून येते.

मी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या सूट सोबत जोडलेले कागदपत्र हे माझी पत्नी रजिया तसेच मेव्हणी मुमताज सोमाणी व मेव्हणा सिराज प्रधान यांनी दिलेले कुळ मुखत्यार पत्र ( पॉवर ऑफ अटर्नी ) यांनी दिलेले असून त्यामध्ये मी कोणत्याही प्रकारे खाडाखोड केलेली नाही. तसेच माझी मुले नामे नामे फैयाज व आसिफ यांनी सांताक्रूझ येथील सिटी सर्व्हे कार्यालय येथे कोणते कागदपत्र सादर केले आहेत त्याबाबत मला काहीही माहिती नाही. मी पोलीसांनी बोलाविल्यानंतर तपासकामी हजर रहाण्यास तयार आहे.

माझा जबाब मराठीत टंकलिखित केला असून, तो मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितला माझे सांगण्याप्रमाणे तो बरोबर आहे.

---

समक्ष

6:15 pm
13/06/2011

सहाय्यक पोलीस निरीक्षक
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.